
# आधुनिक किसान

नैमित्तिक पुरवणी

प्रगत शेतीची पाऊलवाट

वर्ष १ * अंक ७ * २२ ते २८ मार्च २०१२


भारतातील खेडी स्वयंपूर्ण होण्याचा अर्थातच ग्रामस्वराज्याचा विचार महात्मा गांधीजींनी राष्ट्राला दिला. आजच्या आधुनिक युगातही हा विचार सर्वांनाच पटतो. किंबहुना, आजच्या परिस्थितीत ग्रामविकासाची, खेडी स्वयंपूर्ण होण्याची खऱ्या अर्थाने गरज निर्माण झाली आहे. गांधीजींचा हा विचार घेऊन आजही अनेक व्यक्ती, संस्था देशातील खेड्यांच्या, शेतीच्या, व्यक्तींच्या शाश्वत विकासासाठी झटत आहेत. या विचाराला पुढे घेऊन जाण्यासाठी नव्या पिढीतील युवकही सज्ज होत आहेत. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंतच्या सकारात्मक विचारांना, ऊर्जेला चालना देणारे एक 'आधुनिक तीर्थस्थान' जळगावच्या जैन हिल्स येथे साकारले आहे. पद्मश्री भवरलाल जैन यांच्या आयुष्यभराच्या गांधी विचारांच्या चिंतनाचा प्रत्यक्ष परिपाक म्हणजेच हे तीर्थस्थळ, अर्थातच गांधी तीर्थ. गांधी विचारांचा, गांधी मार्गाचा, सत्य, अहिंसा, अपरिग्रह यांसारख्या तत्त्वांचा अभ्यास करण्याचे जागतिक दर्जाचे हे ठिकाण, देशातील खेड्यांच्या समृद्धीसाठीही प्रेरणादायक स्त्रोत ठरेल.




ग्रामविकास, कृषिविकासासह सद्विचारांच्या संस्काराचे आधुनिक प्रेरणास्थान

# गांधी तीर्थ




# दक्षिणेतील पुण्यतीर्थ
# गांधी तीर्थ



**राष्ट्रपिता महात्मा गांधींचे स्मारक बनविण्याचे एक स्वप्न पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांनी पाहिले आणि गांधी तीर्थ च्या रूपाने या स्वप्नाची पूर्तताही झाली. महात्मा गांधीजींच्या या वैशिष्ट्यपूर्ण स्मारकाचे उद्घाटन २५ मार्च रोजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते होत आहे. महात्मा गांधी रिसर्च फाऊंडेशन गांधी तिर्थाचे मुख्य आयोजक आहेत, तर जैन इरिगेशन सिस्टिम्स् आणि भवरलाल व कांताबाई फाऊंडेशन प्रायोजक आहेत. त्या गांधी तिर्थाबद्दल...**

जैन हिल्स् येथे ६५ हजार स्वेअर फूट जागेवर गांधी तिर्थाची उभारणी करण्यात आली आहे. सुमारे तीनशे एकरवर हिरव्यागार वनराईमध्ये या परिसराची व्याप्ती आहे. याच परिसरात गांधीजींविषयी अभ्यास करण्याच्या उद्देशाने येणाऱ्या जिज्ञासू आणि अभ्यासकांची राहण्याची सोय करण्यात आली आहे. या वास्तूच्या निर्मितीसाठी 'ग्रीहा' च्या पर्यावरण पूरक मापदंडांचे पालन



करण्यात आले आहे. त्यामुळेच कमी ऊर्जा लागणाऱ्या साहित्याचा उपयोग केल्याबद्दल 'ग्रीहा-आदर्श' पुरस्कारही या वास्तूला मिळालेला आहे. येथे येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या सोयीसाठी गांधी तिर्थामध्ये विविध विभागांची रचना करण्यात आली आहे. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे.

**शोध गांधीजींचा**

हे गांधीजींच्या जीवनावर आधारित भव्य संग्रहालय आहे. त्यात त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना प्रदर्शित केल्या आहेत. त्यासाठी आधुनिक मल्टिमीडियाचा वापर केल्याने केवळ चित्र आणि आवाजाच्या माध्यमातून जिज्ञासूंना गांधी जीवनाचे दर्शन येथे घडते.

**गिरी (गांधी इंटरनॅशनल रिसर्च इन्स्टिट्यूट) :** ही गांधी रिसर्च फाऊंडेशनची शैक्षणिक शाखा आहे. या अंतर्गत शैक्षणिक उपक्रम राबविले जातील. आंतरराष्ट्रीय मानांकानुसार या शिक्षण संस्थेतील साधनसुविधांची रचना करण्यात आली आहे. येथे येणाऱ्या विद्यार्थी आणि ज्ञानार्थींना आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अशा अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी संलग्नता करण्यात आली आहे.

**जी. आर. एफ. थिंक टँक :** गांधी विचार आणि त्यांच्या जीवनकार्याचा वर्तमानातील घटना घडामोडींशी सुसंगत संबंध जोडून या विचारांचा प्रत्यक्ष उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने समाज आणि विद्यार्थी-ज्ञानार्थींना जोडण्याच्या उद्देशाने या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. हा विभाग वेगवेगळ्या विषयांवर तज्ज्ञांचे परिसंवाद घडवून आणेल आणि गांधीजींच्या विचारधारेच्या माध्यमातून प्रत्यक्ष जीवनात त्याचा वापर करण्यासाठी विद्यार्थी आणि ज्ञानार्थींना प्रेरित करेल.

**गांधीयान**

गांधीजींशी निगडित असलेल्या वस्तू,

पत्र, त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्य पहिल्या प्रती यांसारख्या गोष्टी या विभागात समावेश करण्यात आला आहे.



**अर्काइव्ह :** गांधीजींनी लिहिलेल्या आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व सामग्रीचे संकलन आणि संरक्षण या विभागाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. विशेषत: विद्यार्थी आणि अभ्यासकांसाठी या विभागाचा विशेष फायदा होणार आहे.


**ग्रंथसंपदा**

संस्थेचे संस्थापक भवरलाल जैन यांची अशी इच्छा होती की, महात्मा गांधीजींशी संबंधित सर्व साहित्य गांधी तीर्थमध्ये उपलब्ध झाले पाहिजे. त्यासाठी साहित्य जमा करण्याचे कार्य सुरू आहे. महात्मा गांधीजी, त्यांच्या संबंधित पुस्तकांच्या पहिल्या आवृत्या हे येथील ग्रंथसंपदेचे वैशिष्ट्य आहे. महात्मा गांधीजींनी त्यांच्या जीवनकालात वाचलेल्या पुस्तकांचाही समावेश या ग्रंथसंपदेत करण्यात आला आहे. याशिवाय, गांधीजींनी काढलेल्या हरिजन सारख्या नियतकालिकांचाही समावेश ग्रंथसंपदेत आहे. गांधीजी, विनोबा, सर्वोदय अशा विविध विषयांवर येथील ग्रंथसंपदा आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजरातीबरोबरच अन्य भारतीय आणि विदेशी भाषांतील एकूण ७ हजार १४० ग्रंथ केवळ गांधीजींशी निगडित उपलब्ध आहेत, तर विनोबाजींशी संबंधित विविध भाषांमधील ६६६ ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. हरिजन, हरिजनसेवक अशा विविध नियतकालिके आणि पत्रिकांच्या संग्रहांची संख्या ४ हजार ३६८ इतकी आहे. याशिवाय महात्मा गांधीजींवरील फिल्म्स्, त्यांच्या मूळ आवाजातील भाषणांच्या ध्वनिफिती आणि ४ हजारांपेक्षाही जास्त छायाचित्रांचा संग्रह येथे करण्यात आला आहे.



**शैक्षणिक प्रगतीच्या दिशेने....**

महात्मा गांधी रिसर्च फाऊंडेशन एक आंतरराष्ट्रीय शिक्षण व अभ्यासकेंद्र म्हणून विकसित करण्यात येत असून, महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या गुजरात विद्यापीठासह, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, महाराष्ट्र व सायंटस् विश्वविद्यालय, अमेरिका यांच्याशी संलग्न करण्यात आले आहे. जुलै २०१२ पासून येथे शैक्षणिक उपक्रमांना प्रारंभ होईल. गरीब विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपचीही सोय येथे करण्यात आली आहे. या ठिकाणी सर्टिफिकेट, डिप्लोमा, डिग्री, पदव्युत्तर डिग्री, एम. फील., पी.एचडी., पोस्ट डॉक्टरेट, अंशकालीन संशोधन अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध होणार आहे. *



# गांधी तीर्थ साकारताना....




पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांनी आपल्या आईच्या इच्छेखातर उपजिल्हाधिकारी पदाची नोकरी न करता आईने दिलेल्या केवळ ७००० रुपयांत व्यवसाय सुरू केला. ज्याची आज ४.५ हजार कोटींपेक्षाही उलाढाल आहे. त्यांच्यावर तीन महापुरुषांचा अत्यंत प्रभाव आहे. ते म्हणजे, महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू आणि जे. आर. डी. टाटा. या महापुरुषांच्याच विचारांची परिणती म्हणजे गांधी तीर्थ होय. गांधी तिर्थाची संकल्पना साकारत असताना प्रत्यक्षात त्यांच्या काय भावना आहेत, हे जाणून घेऊ त्यांच्याच शब्दांत...

**- डॉ. भवरलाल जैन**

भारतात जेव्हा आपली पूर्वीची जुनी संस्कृती व सभ्यता नष्ट होऊन पाश्चिमात्य संस्कृतीचा उदय होत होता, तेव्हा अशावेळी समाज, संस्कृती, सभ्य आचार विचारांचा, माणुसकीचा खरा मार्ग दाखवणारा मार्गदर्शक म्हणून महात्मा गांधीजी देशाला मिळाले.

माझे जीवनच गांधी विचार आणि त्यांच्या कार्याने प्रभावित राहिले आहे. तसे जैन धर्मात जन्म झाल्यामुळे सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, अनेकांत सिद्धांत हे सर्व मला अनुभवाच्या रूपात मिळाले आहेत. महात्मा गांधीजींवर भगवान महावीरांचा मोठा प्रभाव होता. खाणे पिणे, अध्यात्मिकता, प्रेमभावना, मधुर वाणी, जशी वाणी तशी करणी, अशा महापुरुषाला मी शोधत होतो. जेव्हा या सर्व गुणांचा एक सागर गांधीजींच्या जागी मला दिसला तेव्हा मी आणखीनच भावनाविवश झालो. खूप दिवसांपासून एक छोटीशी तीव्र इच्छा होती की, महात्मा गांधीजींच्या कार्याची, विचारांची आठवण राहण्यासाठी असे काम करू, ज्यामध्ये त्यांचे जीवन, विचार आणि कार्यांची आठवण चिरंतन राहावी, असे स्मारक बनवू. हे प्रत्यक्षात आणण्यासाठी पैशांची गरज होतीच. तीन चार दशकांपासून प्रामाणिकपणाला साथीला घेऊन पै-पैका जोडत राहून या मनातील इच्छेला खत पाणी देत राहिलो.

**न्या. चंद्रशेखर धर्माधिकारींसोबत गांधी तिर्थाची पाहणी करताना भवरलाल जैन ▼**




जेव्हा जेव्हा जीवनात संकटे, कठीण परिस्थिती येत राहते, तेव्हा मन एकाग्रह करून व स्वतः मी स्तब्ध राहून गांधीजींच्या विचारांचे स्मरण करण्याचा प्रयत्न करतो. सात आठ वर्षांपूर्वी मणीभवनमधून अशी प्रेरणा मिळाली की, संकल्पित गांधी स्मारकाला प्रत्यक्ष मूर्तरूप आले. मी देशातील काही मुख्य शहरांमध्ये जेथे गांधीजींच्या साहित्य सामग्रीचे भांडार होते तेथे जाऊन त्या शहरांतील व्यक्तींशी संबंध प्रस्थापित केले. त्यांचे अनुभव जाणून घेतले आणि तेव्हाच गांधीजींच्या साहित्यांचे संकलन करण्याचा दृढ संकल्प केला. साबरमती, वर्धा, दिल्ली आदी ठिकाणी गेलो. ही ठिकाणे गांधीजींच्या पवित्र स्पर्शाने पावन झाली आहेत. २००४ च्या सुरवातीला महात्मा गांधी राष्ट्रीय संग्रहालयामध्ये महत्त्वपूर्ण साहित्य गांधीजींवर लिहिलेले अथवा गांधीजींनी स्वतः लिहिलेले जेवढे साहित्य होते, ते विकत घेण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यानंतर जशी जशी संधी मिळाली, नवे नवे विचार मिळाले, तसे हा गांधी स्मारकाचा संकल्प पूर्ण करण्यासाठी बळ मिळत गेले आणि तसतसे पुढे जात राहिलो.

गांधी तिर्थावर याल, तेव्हा येथे येतेवेळी मनात कुठलेही, काहीही घेऊन येऊ नका. मात्र, येथे येवून जे आपण अनुभव घ्याल ते घेऊन जावे. एवढाच हा महत्त्वाचा प्रसाद आहे. त्याच्याशिवाय येथे काही नाही. येथे पक्षी राहतील. येथे एक शांत वातावरण राहील आणि येथे बसल्यानंतर जे आपल्या मनात विचार येतील ते शुद्ध स्वरूपातीलच असतील.

जगात जसजशी हिंसा, गुंडगिरी, चैन आणि भौतिक गोष्टींकडे कल वाढत जाईल, त्यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर गांधीजींचे विचार आणि कार्य युवकांना प्रेरित करेल आणि त्यांच्याच माध्यमातून ते वाढतही जाईल. याच विश्वासातून आंतरराष्ट्रीय स्तरावरचे स्मारक व्हावे अशी तीव्र भावना झाली. त्याचेच मूर्तरूप म्हणजे गांधी तीर्थ.

*



# आम्हाला लाभला गांधी विचारांचा संपन्न वारसा

अशोक जैन म्हणजे पद्मश्री भवरलाल जैन यांचे सर्वात मोठे सुपुत्र. वडिलांमुळे त्यांच्यावरही गांधी विचारांचे संस्कार झाले आहेत. त्यामुळेच जैन समूहाच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळतानाच, ते देशातील अनेक सामाजिक संस्थांशीही जोडलेले आहेत. गांधी रिसर्च फाऊंडेशनची जबादारी वडिलांनी त्यांच्याकडेच सोपविली आहे. गांधी तिर्थाच्या निमित्ताने त्यांनी व्यक्त केलेले मनोगत....

**- अशोक जैन**
उपाध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टिम्

आदरणीय मोठ्या भाऊंनी (डॉ. भवरलाल जैन) आजतागायत जे कार्य हाती घेतले, ते विधीपूर्वक पूर्ण केले. निसर्ग आणि पर्यावरण रक्षणाचे विचार त्यांना आपल्या आईकडून मिळाले आणि त्यांचे प्रत्यक्षात पालन करण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस मेहनत घेतली. दूरदृष्टी ठेवून आपल्या कार्याला जगाच्या कल्याणासाठी त्यांनी जोडून घेतले. म्हणूनच जैन इरिगेशनच्या स्थापनेत केवळ पैसे कमावणे हा उद्देश नव्हता, तर आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह होण्याबरोबरच देशातील शेतकऱ्याला योग्य साधने मिळून त्याचे जीवनमान सुधारावे, हा उद्देश होता आणि त्या दिशेने प्रयत्नही झाले. त्यामुळेच आज मोठ्या भाऊंना समाजात प्रतिष्ठा लाभली आहे. आईच्या विचारांबरोबरच भगवान महावीर यांच्या अहिंसा, अपरिग्रह या तत्त्वांच्या पालनामुळे त्यांना शांतता आणि समृद्धीचा लाभ झाला. अशाप्रकारे लहानपणापासूनच त्यांच्यात गांधी विचारांची बिजे रोवली गेली. त्याच्या जोडीला शेजारधर्माचे पालन आणि मानवतेची शिकवणही त्यांना याच वयात मिळाली. त्यांना मिळालेल्या विचारांचे दृढतेने त्यांनी पालन केले, म्हणूनच भविष्यात जसजशी त्यांची आर्थिक स्थिती सुधारत गेली, तसतसे त्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाचे पालन करण्यासाठी सुरवात केली. महात्मा गांधीजींच्या तत्त्वांचा प्रत्यक्ष जीवनात ते उपयोग करत आहेत. याच तत्त्वाच्या पालनासाठी गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातून एक दिशा देण्याचा प्रयत्न ते करत आहेत. फाऊंडेशनच्या बाबतीत आता विचार केला आणि लगेच कामाला सुरवात केली, असे झाले नाही; तर आयुष्यभर केलेल्या चिंतनाचे सार आणि त्याला दिलेली प्रत्यक्ष कृतीची जोड याचा परिपाक म्हणजे गांधी रिसर्च फाऊंडेशन. त्यातूनच पुढे साकार झाले गांधी तीर्थ. त्यासाठी त्यांनी दूरदृष्टी ठेवून या तिर्थाला जागतिक पातळीवर आणण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. जगभरातील ज्येष्ठ गांधीवाद्यांनी पुढाकार घेऊन या कामासाठी सहकार्य केले आणि त्यामुळेच भाऊंचे स्वप्न वास्तवात साकार होत आहे.

भाऊंच्या कार्यशैलीबरोबरच त्यांनी हातात घेतलेल्या प्रत्येक कामावर गांधी विचारांचे प्रतिबिंब दिसून येते. १९६३ च्या सुमारास जे काही उद्योगपती होते, त्यापैकी बोटावर मोजण्याइतपतच लोकांनी गांधी विचारांचा अनुनय केला, हे मी नम्रतापूर्वक सांगू इच्छितो. आमच्या कुटुंबामध्ये गांधी विचारांबद्दल जी आस्था होती, तिला कृतीत आणण्याचे काम भाऊंनी केले. त्यामुळे आम्ही स्वत:ला खूप नशीबवान समजतो. नीतिमत्तेशी त्यांनी कधीही तडजोड नाही. रॉकेलबरोबरच खत आणि बियाणांचाही त्यांनी व्यवसाय केला. या व्यवसायातही त्यांनी प्रामाणिकपणा जपला होता. त्याबद्दल एक घटना आजही मला आठवते. त्याकाळी कापसाच्या बियाणांची टंचाई होती. स्वाभाविकपणे बियाणे घेण्यासाठी शेतकऱ्यांची झुंबड उडे. तेव्हा भाऊंनी प्रशिक्षणार्थी म्हणून आम्हाला काऊंटरवर पावती फाडण्यासाठी बसवले. मी भाऊंचा मुलगा आहे, याची ग्राहकांना अर्थातच कल्पना नव्हती. बियाणेटंचाईमुळे प्रत्येक शेतकऱ्याला बियाण्याच्या केवळ दोन थैल्या दिल्या जात असत. अशात एकाने मला थैलीमागे दहा रुपये जास्त घेऊन अतिरिक्त थैलीची मागणी केली आणि इथेच भाऊंचे प्रामाणिकपणाचे संस्कार कामाला आले. भाऊंना या प्रकारे पैसे कमावणे आणि त्यातून लोकांचे शोषण करणे अजिबात मान्य नव्हते. या प्रामाणिकतेमध्ये गांधी विचारांची छापच मला महत्त्वाची वाटते.

भाऊंमुळे गांधी विचारांचा प्रभाव अनुवंशिकतेने आमच्यातही पाहायला मिळेल. आम्हाला त्यांच्याप्रमाणेच प्रामाणिकपणाच्या मार्गाने काम करायचे आहे, त्यासाठी मिळणारी ताकद ही आमच्यावर झालेल्या संस्कारांतून आलेली असेल. गांधी तिर्थाच्या निर्मितीमुळे आमच्यातील या वैचारिक बैठकीला आणखी मूर्तस्वरूप लाभणार आहे. आमच्यावरील संस्कार अधिक ताकदवान होतील. त्यातूनच येणाऱ्या पिढ्यांवरही या संस्कारांचा प्रभाव पडेल, याबाबत मला तरी मुळीच शंका वाटत नाही. म्हणूनच गांधी तीर्थ हे केवळ वास्तू नव्हे, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी मार्गदर्शन करणारे तीर्थ बनणार आहे. *

# गांधी तीर्थ

भारताच्या राष्ट्रपती

**श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील**

यांच्या शुभहस्ते

आणि

महाराष्ट्राचे राज्यपाल

**श्री. के. शंकरनारायणन्**

यांच्या अध्यक्षतेखाली

## मानवतेला समर्पित

रविवार, २५ मार्च २०१२, जैन हिल्स, जळगाव, महाराष्ट्र

## गांधी रिसर्च फाऊंडेशन

न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी — चेअरमन

भवरलाल हिरालाल जैन — संस्थापक



प्रायोजक: जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड आणि भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन मल्टिपर्पज फाऊंडेशन, जळगाव, महाराष्ट्र